दि. ०४ /१२/२०२३

# सूचना

**शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये "भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजने" अंतर्गत लाभ मिळण्याबाबत अर्ज भरण्यासाठी**

१) **"भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना"** या योजने अंतर्गत लाभ मिळण्यासाठी अनुसूचित जाति (SC) व नव बौद्ध प्रवर्ग असलेल्या पात्र विद्यार्थ्यांनी स्वतः नोंदणी (registration) करून अर्ज भरणे आवश्यक आहे. त्यासाठी ऑनलाइन पोर्टलची लिंक पुढीलप्रमाणे आहे:

**https://swadhar.acswpune.com**

२) ज्या विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरला असेल, अशाच विद्यार्थ्यांचे अर्ज ऑफलाइन पद्धतीने स्वीकारले जातील

३) जे विद्यार्थी स्वाधार योजनेस पात्र ठरणार नाहीत अथवा या योजनेचा लाभ स्वेछेने घेऊ इच्छित नाहीत, अशा विद्यार्थ्यांनी सोबत जोडलेले प्रतिज्ञापत्र योग्यरित्या भरून सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ येथील "शिष्यवृत्ती योजना - वित्त व लेखा विभाग" येथे जमा करणे बंधनकारक आहे.

४ ) दिनांक ११ ते २० डिसेंबर २०२३ या कालावधीत सकाळी ११.३० ते सायंकाळी ५.०० या वेळेत योग्यरित्या भरलेले प्रतिज्ञापत्र सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठातील "शिष्यवृत्ती योजना - वित्त व लेखा विभाग" येथे दाखल करावेत त्या मुदतीनंतर कोणतेही प्रतिज्ञापत्र विद्यापीठातर्फे स्वीकारले जाणार नाही .

५) ऑनलाईन भरलेल्या अर्जाच्या **३ प्रती** व सोबत ऑनलाईन जोडलेली **मूळ कागदपत्रे** आणि त्या कागतपत्रांच्या **दोन छायांकित प्रती** असे **तीन संच** सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठातील "शिष्यवृत्ती योजना - वित्त व लेखा विभाग" येथे दिनांक ११ ते २० डिसेंबर २०२३ या कालावधीत सकाळी ११.३० ते सायंकाळी ५.०० या वेळेत सादर करावीत त्यानंतर कोणतेही अर्ज विद्यापीठातर्फे स्वीकारले जाणार नाही, याची नोंद घ्यावी. या ३ संचापैकी **एक संच विद्यार्थांनी स्वत:कडे** जतन करणे आवश्यक आहे.

सर्व पात्र विद्यार्थ्यांनी सदर योजनेचा लाभ घ्यावा

Finance & Account Officer
COEP Technological University,
Pune- 5

TECHNOLOGICAL UNIVERSITY ★ COEP ★ A Unitary Public University of Government of Maharashtra